| MHBI100002042022 | **नियमीत दिवाणी दावा क्रमांक ५६/२०२२ मधील**<br>**निशाणी क्र. २७ खालील आदेश** |
|---|---|

[०१] प्रस्तुतचा अर्ज हा वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश २६ नियम ९ अन्वये न्यायालयीन आयुक्त नेमण्यासाठी सादर केलेला आहे.

[०२] वादीच्या अर्जाप्रमाणे त्याची वादग्रस्त मिळकत जिचे वर्णन पुर्वेस-शिव रस्ता सौंदणा इस्थळ, पश्चिमेस-प्रतिवादी क्र.३, दक्षिणेस-वादी क्र.१, उत्तरेस प्रतिवादी क्र.२ यांची जमीन आहे. वादी हे मौजे बनसारोळा येथील रहिवासी असुन प्रतिवादी हे मौजे सौंदणा येथील रहिवाशी असुन ते एकमेकांलगतचे वहितीदार आहेत. वादी ही वादग्रस्त मिळकतीचा मालक व ताबेदार या नात्याने उपभोग घेत असतांना वादी ही मौजे बनसारोळा येथील रहिवाशी असल्याचा गैरफायदा घेवुन प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी आपसात संगणमत करून दिनांक ०७.१२.२०२१ रोजी वादग्रस्त मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्या दरम्यान असणारा नंबर बांध व काकरी खुणा मोडुन खोडुन अतिक्रमण करण्याचा प्रयत्न केला. तसेच आपसात संगनमत करून वादीच्या वादग्रस्त मिळकतीचे पश्चिम, दक्षिण, व उत्तर दिशेकडुन वेगवेगळया प्रकारे अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करत आहेत. वादीच्या क्षेत्रावर अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करत आहेत. अशा परिस्थितीत वादग्रस्त मिळकतीच्या क्षेत्राचा व हद्दीचा वाद संपुष्टात येण्यासाठी वादग्रस्त जमीनीची मोजणी करुन वादीच्या जमिनीची हद्द कायम करुन करणेसाठी न्यायालयीन आयुक्त म्हणुन उपअधिक्षक, भुमि अभिलेख, केज यांची नेमणुक करणे गरजेचे आहे. न्यायालयीन आयुक्ताची नेमणुक करुन, दावा मिळकतीच्या हद्दी खुणा निश्चीत करुन, त्याबाबतचा नकाशा व अहवाल मागविण्याच्या मागणीसह प्रस्तुत अर्ज सादर करण्यात आलेला आहे.

[०३] प्रतिवादी यांनी आपले म्हणणे निशाणी क्र.२९ वर दाखल करुन वादग्रस्त जमीन वादीला शीलिंग मध्ये मिळाली असुन शासनाच्या परवानगीशिवाय सदर मिळकतीचे खरेदीखत होत नाही, म्हणुन वादीची कथने अमान्य करून अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

[०४] अर्जाचे, त्यावरील म्हणण्याचे आणि अभिलेखाचे अवलोकन केले.

[०५] दोन्ही बाजुच्या विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

[०६] प्रस्तुत दावा हा मालकी घोषित होवुन निरंतर मनाई हुकूम मिळणेबाबत दाखल केलेला आहे. वादीच्या दाव्याचे अवलोकन केले असता वादग्रस्त मिळकतीतील वादीच्या हिस्याचा स्थानिक नकाशा दाव्यात दाखल केलेला आहे. तसेच प्रतिवादीने अतिक्रमण केलेले क्षेत्र निळया रंगाने दर्शविलेले आहे. प्रतिवादी हे वादग्रस्त जमीनीच्या चतुःसिमेतील लगतचे शेजारी आहेत. वादी ही वादग्रस्त मिळकतीचा मालक व ताबेदार या नात्याने उपभोग घेत असतांना वादी ही मौजे बनसारोळा येथील रहिवाशी असल्याचा गैरफायदा घेवुन प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी आपसात संगणमत करून दिनांक ०७.१२.२०२१ रोजी वादग्रस्त मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्या दरम्यान असणारा नंबर बांध व काकरी खुणा मोडुन खोडुन अतिक्रमण करण्याचा प्रयत्न केला. तसेच आपसात संगनमत करून वादीच्या वादग्रस्त मिळकतीचे पश्चिम, दक्षिण, व उत्तर दिशेकडुन वेगवेगळया प्रकारे अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करत आहेत. दाव्याचे स्वरुप पाहता वादग्रस्त मिळकतीवरील क्षेत्राची मोजणी केल्यास जायमोक्यावरील परिस्थीती, हद्दी खुणा इत्यादी गोष्टी अभिलेखावर आल्यास वाद सोडविण्यास न्यायालयास मदत होवू शकते. प्रतिवादींनी घेतलेल्या हरकती या प्रस्तुत अर्ज नामंजुर होईल इतपत दाव्याच्या या पायरीवर महत्वाच्या दिसुन येत आहेत. म्हणून अर्ज मंजूर करणे संयुक्तीक व न्यायोचित होईल. त्यामुळे दाव्यातील विशीष्ट

परिस्थितीचा विचार करता, खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

**(१)** उपअधिक्षक भूमिअभिलेख, केज, ता.केज जि.बीड यांना कोर्ट कमिशनर म्हणून नियुक्त करण्यात येते.

**(२)** उपअधिक्षक भूमिअभिलेख, ता. केज यांनी सर्वे नं. ३५४ मधील मौजे सौंदणा, ता.केज, जि.बीड येथील वादी व प्रतिवादी यांच्या वादग्रस्त जमीनीच्या क्षेत्राचे चारीही बाजूने मोजमाप करुन अतिक्रमण असल्यास ते निश्चित करुन त्याबाबत एक महिन्याच्या आत मोजणी अहवाल, नकाशा व इतर कागदपत्रे इ. न्यायालयात सादर करावा.

**(३)** वादी व प्रतिवादी मोजणी करण्यासाठी नियमानुसार लागणार खर्च प्रस्तुत आदेश झाल्यापासून एक महिन्याच्या आत भरावा.

**(४)** वादीने दाव्याची प्रत, वादग्रस्त जमिनीचे सातबारा उतारा, वादातील क्षेत्रामधील सर्व सहिस्सेदार व वादातील क्षेत्राला लागुन असलेल्या क्षेत्रधारकाची नावे व पत्ते दाखल करावे.

**(५)** वादीने पुर्तता केल्यानंतर संबंधितांना writ पाठवावी.

सही/-

(ए.टी. जगताप)

दिनांक:- २९.०१.२०२५.

३ रे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
केज.

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF file are same word to word, as per the original Order / Judgment.

| | |
|---|---|
| Dictated on | : 29.01.2025 |
| Transcribed on | : 29.01.2025 |
| Checked & signed on | : 29.01.2025 |

Sd/-

(P. P. Raut)

Stenographer Grade-3,

Ct. of 2nd Jt. CJJD and JMFC, Kaij.